# होमा ऑर्गॅनिक फार्मिंग

**श्री वसंत परांजपे**

होम कृषी पद्धति हे प्राचीन वेद विज्ञानाचे माध्यमातून प्रगट झालेले कृषी शास्त्र आहे. विश्वाच्या निर्मिती बरोबरच हे प्राचीन शास्त्र दिले गेले. काळाच्या ओघात हे ज्ञान लुप्त झाले. आपण सर्वजण पृथ्वीच्या प्रदूषित स्थितीत सर्व बाजूनी वेढले गेलो असल्याने त्यात बदल कसा होऊ शकेल याबाबत लोकांना मार्गदर्शन मिळण्यासाठी हे शास्त्र आता पुनरुज्जीवित केले जात आहे.

प्रदूषणाच्या विपरीत परिणामामुळे निसर्गाच्या घटकांमध्ये बदल होऊ लागतात. अथर्ववेदात सांगितल्याप्रमाणे अणूंची जोडणी, अणूंचे संलग्नीकरण विचित्र पद्धतीने होऊ लागते. असे घडू लागल्यास संपूर्ण मानव संस्कृति पूर्णतः नष्ट होऊ शकेल. अशा वेळी होम कृषी पद्धतीचा अवलंब केल्यास त्याच्या प्रभावामुळे घटना सुसंवादी रितीने घडू लागतात आणि त्यातून एक नवीन हितकारक घटक तयार होतो. निर्माण होतो असे आम्ही म्हणत नाही हे ध्यानात घ्या. कारण काहीही निर्माण होत नाही तर जे आहे त्यास पुनर्आकार देता येतो. *हे ज्ञान म्हणजे होम चिकित्सा.*

**या होमा थेरपी ज्ञानाचा उपयोग करून रासायनिक खते अगर कीटनाशके यांचा वापर न करता आपण उत्तम पीक घेऊ शकतो. यालाच होम कृषी पद्धति म्हणतात. अग्निहोत्र हा मूलभूत होम आहे. जीव सृष्टीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अग्निहोत्र या भौतिक साधनाचा उपयोग अनिवार्य आहे.**

शास्त्रज्ञांनी प्रदूषणाचे निवारण करण्यासाठी केलेले सर्व उपाय विफल ठरले आहेत. अशा वेळी हे प्राचीन होम कृषीशास्त्र पुनरूज्जीवित केले जात आहे. हे ज्ञान सर्वांसाठी दिले आहे. याचा आपल्या दैनंदिन जीवनात कोणीही उपयोग करू शकतो. होमाचा वनस्पती सृष्टीवर फार प्रभावी परिणाम होतो. होमाचा हितकारक परिणाम मानवासह सर्व प्राणीमात्रावर होतो. परंतू वनस्पती सृष्टीवर होणाऱ्या परिणामांचे मोजमाप करणे फार सुलभ रितीने होऊ शकते.

*जगाचे भवितव्य शास्त्रज्ञांचे हाती आहे.* **पीक कसे काढावे, कमीत कमी भूक्षेत्रातून जास्तीत जास्त उत्पादन कसे घेता येईल, जमीनीचा पोत कसा टिकविता येईल, जलाशये शुद्ध कशी ठेवता येतील, वातावरण पुष्टीकरक कसे ठेवता येईल** हे सर्व होम कृषी पद्धतीत सांगितले आहे. बी बियाणांवर प्रक्रिया कशी करावी, पेरणी केंव्हा करावी, पीकाचे पोषण कसे करावे, पीकाची काढणी केव्हा व कशी करावी हे सर्व वेदांचे माध्यमातून सांगण्यात आले आहे. वेदातील प्राचीन विज्ञानाचा हा खजिना आपणास शास्त्रज्ञ केंव्हा शोधून काढतील याचीच वाट पहात आहे.

आपल्याला तंत्रज्ञानाचा स्वर्ग सापडला आहे असे आपणास वाटते. पण हा स्वर्ग पुढील काही वर्षात नर्क ठरणार आहे. आपल्याला आवडो अथवा न आवडो आपण आपल्याला तंत्रज्ञानाच्या मायावी चंदेरी जाळयातून मृत्यूच्या जबड्यात ढकलून दिले आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञान यात फरक आहे. विज्ञान म्हणजे सत्याचा शोध. आपण जवळ जवळ अशा स्थितीस येऊन पोहोचलो आहोत की जेथे आपणास प्रदूषणविरहित नैसर्गिक साधन संपत्ती मिळणे दुरापास्त आहे. आपली सर्व जलाशये प्रदूषित होतील. काही क्षेत्रात जबर दुष्काळ तर काही ठिकाणी प्रचंड महापूर अशी स्थिती येत आहे. या गोष्टी आताच घडू लागल्या आहेत हे आपण घ्यानात घेतले पाहिजे. **पर्यावरण, जमीन, पाणी आणि सर्व जीव सृष्टी यांचेवर प्रदूषणाचा होणारा गंभीर परिणाम नष्ट करण्यासाठी आपण शास्त्रीय उपायांवर भिस्त ठेवली पाहिजे**. सर्व देशातील शास्त्रज्ञ आणि शासन यंत्रणा यांना या संभाव्य गंभीर परिस्थितीची पुरेपूर जाणीव आहे. लोकांचे पर्यावरणाविषयीचे अज्ञान आणि भौतिक समृद्धीच्या खोट्या भ्रामक कल्पना यांनी माणसाची विवेक बुद्धी झाकाळलेली आहे. माणसाच्या बेफिकिरपणाचा अंत विनाशाचा जबरदस्त हादरा बसण्यात होणार आहे. म्हणून आज सर्वसमावेशक होमा थेरेपीची निकडीची गरज आहे. शास्त्रज्ञानी प्रदूषणाच्या या विघातक परिणामांचे निराकरण करण्याची होमा थेरेपीची क्षमता तपासून पहावी अशी आम्ही कळकळीची विनंती करतो.

निसर्गातील सर्व सजीव, वनस्पती, वृक्ष, वने, आपण पेरणी करतो ती पिके, प्राणी आणि मनुष्य हे सर्व भयानक प्रदूषकांच्या परिणामामुळे अशा पद्धतीने उघडे पडले आहेत की आता त्यांना हानिकारक परिणामांपासून स्वतःस वाचविणे कठिण आहे. **जमीनीतील सूक्ष्म जीवाणू झपाट्याने नष्ट होत आहेत. होमाचे वातावरण असल्या शिवाय आता खाण्यासाठी अन्न मिळणे दुरापास्त होणार आहे.**

आता, जग वाचविण्याचा एकमेव उपाय म्हणजे अग्निहोत्र, मूलभूत होम (यज्ञ) करणे हा होय. जर कोणी यापेक्षा चांगला, सोपा आणि व्यवहार्य मार्ग दाखविणार असेल तर तो मार्ग ऐकून घेण्यास आम्ही तयार आहोत.

अणूभट्टीतून आणि अणूभट्टीतील टाकावू भागाची विल्हेवाट करण्याच्या यंत्रणेत अणू किरणांची गळती सुरू झाल्याबरोबर त्या विभागात निवास करण्याऱ्या लोकांना कोणत्याही क्षणी स्फोट होऊ शकेल अशा डायनामाईटवर आपण बसलो आहोत असे भासेल. किरणोत्सर्गी पदार्थांबाबत व किरणोत्सर्गी ऊर्जेचा दुरूपयोग झाल्यास त्यातून निर्माण होणाऱ्या संभाव्य परिणामांच्या व्यापकतेचा पूर्ण विचार न करता, किरणोत्सर्गासारख्या विध्वंसक शक्तीचा महाराक्षस उभा केल्याबद्दल लोक शास्त्रज्ञांवर रागावतील. यावर परिणामकारक प्रतिबंधात्मक उपाय शोधण्यासाठी शास्त्रज्ञांवर प्रचंड दडपण येईल. यासाठी शास्त्रज्ञ प्रयत्नांची पराकाष्टा करतील. परंतू याचे उत्तर येथे आहे. आणि ते म्हणजे अग्निहोत्र होम आणि दैवी विज्ञान की जे ईश्वरी शक्तीने आम्हाला निमित्त करून प्रकट केले आहे. आम्ही जे सांगत आहोत त्यावर मुळीच विश्वास ठेऊ नका. वैतंदिन अग्निहोत्राचे आचरण करण्यास आरंभ करा आणि आपणास येणाऱ्या अनुभवांवरून स्वतःची खात्री पटवून घ्या. शास्त्रज्ञांनी याची शहानिशा करावी अशी आमची मागणी आहे.

रासायनिक खते आणि जंतूनाशके, कीटनाशके यांचा वापर करू लागल्यावर कालांतराने त्यांची मात्रा वाढविणे, परिणामकारकता येण्यासाठी गुणवत्ता वाढविणे, किंवा निर्मिती सूत्र बदलणे आवश्यक ठरते. नंतर अशी अवस्था येते की त्यांचा वापर केल्याशिवाय काहीच उगवत नाही. आणि जर आपण त्यांचा वापर केलाच तर त्यामुळे जमीन आणि जमीनीखालील पाणी अधिक दूषित होते. अशा परिस्थितीत उगवलेले अन्न, धान्य पदार्थ आपण खाल्ल्यास घातक रसायने शरीरात प्रवेश करतात. **काही वर्षानंतर त्या जमीनीत काहीही उगवत नाही. जी जमीन पूर्वी सुपीक होती, अन्नधान्याचे उत्पन्न भरपूर देत असे ती कायमची सोडून द्यावी लागते**. अशा काही कारणांमुळे अनेक शेतकरी कम्युनिटीज सेंद्रिय शेती आणि जैविक कीडनियंत्रण या पर्यायांच्या दिशेने विचार करू लागल्या. याचा प्रभाव काही काळ पडला. **परंतू जसजसे वातावरणांतील प्रदूषण वाढू लागले तसतशी गुंतागुंत वाढू लागली आणि परिणामतः सेंद्रिय शेती करणारे शेतकरी फार भयंकर अडचणीत आले.**

**पृथ्वीवर आम्ल वर्षा होण्याचे प्रमाण हळू हळू वाढू लागल्यावर पृष्ठभागावरील काही इंच जमीन शेतीसाठी पूर्णतः उध्वस्त झालेली आढळेल**. पृष्ठभागाखालील पंधरा सेंटीमीटर जमीनीतच या समस्येचे उत्तर शोधावे लागेल. होमा थेरेपी कृषी हाच त्यावर एकमेव उपाय आहे.

प्रदूषणाने जमीनीच्या अंतर्रचनेत जबरदस्त बदल होऊ लागतात. आणि त्यांचे परिणाम फार अनर्थकारक होतात. वनस्पती आणि अन्य जीव यांचे पोषण करण्याची जमीनींची क्षमता कमालीची क्षीण होऊ लागते. यावर निश्चित उपाय म्हणजे अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर होम हवन सुरू करून त्या द्वारे वातावरण अधिक पुष्टिकारक आणि सुगंधित करणे.

प्रदूषणामुळे अनेक ठिकाणी जमीन वनस्पतींचे पोषण करू शकत नाही. अशा अज्ञात कारणानी वृक्ष उन्मळून पडू लागतात.

असे असताना सुद्धा जर वनस्पतीजवळ नियमितपणे अग्निहोत्र केले तर ती वनस्पती आनंदाने नाचू लागते आणि तिची झपाट्याने वाढ होते. होमाद्वारे वनस्पतींची जोपासना होत असल्याने होमाकडून मिळणाऱ्या पोषकांबद्दल ती कृतज्ञ राहते.

अणूंच्या विघटन आणि एकीकरण क्रियेत बदल झाल्याने त्यांच्या रचनेत बदल होतो. त्यामुळे मूलद्रव्यांच्या गुणधर्मात बदल होतो – मूलद्रव्यांच्या अणूंच्या संरचनेत आणि वजन यात फरक होऊ लागतो. इलेक्ट्रॉन आणि न्यूट्रॉन यांच्या भ्रमण गतीत फरक होऊ लागतो. शास्त्रज्ञांना योग्य अशी सूक्ष्म दृष्टी दिल्यास आणि त्यांनी होम शास्त्राचे दृष्टीकोनातून या ज्ञानाकडे पाहिल्यास काही क्षेत्रात या ज्ञानाचा हितकारक रितीने उपयोग होऊ शकतो

हे आम्ही त्यांना दाखवू शकतो. जमीनीतील पोषण द्रव्यांची रचना विस्कळीत होते. आणि याचा अन्नधान्य उत्पादनावर फार मोठा विपरित परिणाम होतो. प्रदूषण हा रोग आहे. होम हा त्यावर उपचार आहे. प्रदूषणाने पर्यावरणातील जी पोषणद्रव्ये नष्ट केली आहेत त्यांची पुर्नभरणी होम केल्याने होते. **सूक्ष्म जंतूंची, बॅक्टेरियाची रासायनिक संरचना आणि अणूंची संरचना (मॉलेक्युलर स्ट्रक्चर) यात बदल होतो. आणि म्हणून पारंपारिक रासायनिक औषधोपचार पद्धतीचा त्यांचेवर काहीही परिणाम होत नाही**. होम हवन केल्याने ही परिस्थिती सुधारू लागते.

## वनस्पतीची संरचना आणि शरीरशास्त्र विज्ञान (फिजिओलॉजी)

होम हवनाच्या वातावरणात वाढलेल्या वनस्पतींच्या रसवाहिन्यांच्या जाळया नेहमीपेक्षा आकाराने मोठ्या आणि दंडगोल (सिलिन्ड्रिकल) असतात. त्यामुळे वनस्पतींच्या सर्व भागात पाणी आणि पोषण द्रव्ये वाहून नेण्याचे कार्य सहजतेने आणि सुलभतेने होते. यामुळे वाढ आणि प्रजनन चक्र या क्रियांस मदत होते. परिणामतः ऑक्सिजन पुनर्चक्रित करण्याच्या निसर्ग कार्यास मदत होते. त्यामुळे हरित द्रव्य (क्लोरोफिल) निर्मिती कार्यास आणि वनस्पतींचे श्वसन कार्यासही मदत होते. परिणामतः ऑक्सिजन, कार्बन डाय ऑक्साइड पुनर्चक्रीत करण्याच्या कार्यास मदत होते.

आपण जर होमा वातावरणात वाढवलेल्या वनस्पतींची तुलना होमा वातावरणात न वाढविलेल्या वनस्पतींच्या पेशींच्या संरचनेच्या स्लाईडशी केली तर आपणास फरक आढळेल. सूक्ष्म शक्तींचा वनस्पतीवरील प्रभाव आता जास्त जाणवू लागेल. जर एखाद्या वनस्पती शास्त्रज्ञाने त्यात लक्ष घातले तर तो याची नोंद सहजपणे करू शकेल.

**प्रदूषणाने वनस्पतींच्या अणु संरचनेत बदल झाल्यामुळे मानवाला जिवंत राहण्यासाठी लागणारी पोषण द्रव्ये वनस्पती पासून घेणे अशक्य झाले आहे. वनस्पती अग्निहोत्र वातावरणात आणि अग्निहोत्र भस्माचा उपयोग करून वाढविल्यास प्रदूषणाने होणाऱ्या बदलास वनस्पती प्रतिकार करते आणि निसर्गातील समतोलात आपले स्थान राखून ठेवते.**

वनस्पतींचे पॅथॉलॉजीकल स्ट्रक्चर (रोगनिदान संरचना), पोषण द्रव्यांची संरचना यात बदल होत आहे. वनस्पती अग्निहोत्र वातावरणात वाढविल्यामुळे बरीच पोषण द्रव्ये, स्वाद, आणि यापेक्षाही विशेष एक नवीन हितकारक 'अपूर्व' एका लहानशा जागेत ठासून भरले जाते आणि संतोष (गुणवत्ता आणि परिणाम यांचे दृष्टीने) आणि आरोग्य प्रदान करते. स्वाद, पोत, रंग, गर (म्हणजे बी) अत्युत्कृष्ट होते.

**होम हवनाचे वातावरणामुळे वनस्पतींच्या मुळांची रचना बदलते. वनस्पती जमीनीतील उच्च गुणवत्तेची पोषण द्रव्ये शोषून घेत असल्यामुळे, मुळे लहान आणि कमी त्रासदायक राहतात.**

सोयाबीन पिकाचे संदर्भात होमा थेरेपी कृषी मध्ये एक नवीन नवल विशेष घडते. जेथे शक्य असेल तेथे शेतकऱ्यांनी शेतातील एक भाग सोयाबीन लागवडीसाठी राखून ठेवावा. होमा कृषी तंत्राचा वापर केल्याने सोयाबीनच्या पॅथॉलॉजीकल स्ट्रक्चर मध्ये (रोग निदान विषयक संरचनेत) विस्मयकारक स्थिती उद्‌भवते. हे सोयाबीन भोजनात सेवन केल्यास एक रासायनिक प्रक्रिया घडून शरीरात अँटी बॉडीज तयार होतात. या अँटी बॉडीजमुळे वैद्यकीय व्यवसायातील तज्ज्ञांना आज ज्ञात असणारे रोग आणि भविष्यकाळात येऊ घातलेले नवीन रोग, अशा अनेक रोगांना प्रतिकार करण्याची क्षमता शरीरात निर्माण होते. ज्या ठिकाणी सोयाबीनचे पीक घेताना होमा थेरेपी तंत्राचा उपयोग केला असेल तेथेच फक्त ईश्वर कृपेने हे घडेल.

## वनस्पतीची कार्ये

बागेमध्ये अथवा झाडाखाली होम हवन केल्याने त्यातून निर्माण होणाऱ्या धुराचा परिणाम झाडांच्या पानावर होतो. क्लोरोफिल निर्माण होण्याच्या कार्यात हा धूर कॅटॅलिस्ट म्हणून कार्य करतो. एखाद्या वनस्पती शास्त्रज्ञाने या विषयाचा अभ्यास कारण्याचे ठरविल्यास येथे घडून येणारी रासायनिक प्रक्रिया तो कोणासही दाखवू शकेल.

होमा, विशेषकरून या छोट्या अग्निहोत्राचे वातावरण, वनस्पतीच्या चयापचय (मेटाबोलिझम्) क्रियेत कॅटॅलिस्ट म्हणून कार्य करते. यामुळे वनस्पतीस आवश्यक असलेली पोषण द्रव्ये, प्राप्त करण्यास सहाय्य करते. अग्निहोत्राचे वातावरणात पर्यावरणात संतूलन येण्यासाठी वनस्पती अधिक सक्षम होते. वनस्पतींच्या मूळांची रचना नाडी व्यवस्थेप्रमाणे असते. मूळांची रचना आवश्यक ती ऊर्जा जमीनीपासून घेते. या मूळांच्या रचनेचा पुरेसा विकास झाला असल्यास ऊर्जेचे आणि पोषण द्रव्यांचे वितरण वनस्पतींच्या सर्व भागांत होते. त्यामुळे वनस्पतीची वाढ पर्यावरणाशी सुसंवाद साधून होते. योग्य रितीने होम केला गेल्यास व्हॅस्क्युलर सिस्टिम द्वारे (अभिसरण व्यवस्थेद्वारे) वनस्पतीच्या सर्व भागात पोषण द्रव्ये पाठविली जातात. अत्यंत सूक्ष्म पातळीवर मानवातही अशाच प्रकारे कार्य होत असते.

## पीक उत्पादन

**अग्निहोत्र वातावरणात वनस्पती वाढवित असताना वनस्पतीचा आकार आणि विस्तार मोठा होईलच अशी अपेक्षा करू नका. त्या ऐवजी भाजीपाला, फळे, फुले यांचे आकार, गुणवत्ता आणि बाह्य स्वरूप यांचे निरीक्षण करा.** होम करण्याने वनस्पती आनंदित होते आणि तिची सर्व ऊर्जा उत्पादन वाढविण्याकडे वळविली जाते. होम हवन करण्याने वातावरणात पोषण द्रव्ये प्रक्षिप्त केली जातात. वनस्पतीच्या ऊर्जा पॅटर्नची मांडणी विशिष्ट पद्धतीने केली जाते. या पॅटर्नना आकार आणि त्यांची घडण समरूप व समतोल होते. याचा परिणाम प्रचंड उत्पादन आणि उत्कृष्ट दर्जा यात होतो. अग्निहोत्र हा मूलभूत होम आहे. अग्निहोत्र वातावरणात वनस्पती वाढत असली तर तेथे एक विशेष घटना घडून येते. वनस्पतीचे सान्निध्यात अग्निहोत्र केल्यास वनस्पती पासून एक ओरा सदृश ऊर्जा क्षेत्र निर्माण होते आणि ते वनस्पती सभोवती राहते. या ऊर्जा क्षेत्रात पोषण द्रव्ये आणि प्रेमाची स्पंदने असतात. वनस्पतीच्या जवळपासच्या क्षेत्रात अग्निहोत्र केल्याने वनस्पती या साधनापासून सतत ऊर्जा घेत राहते. असे असल्याने वनस्पतीची जास्तीत जास्त वाढ होते तसेच तिची उत्पादन क्षमता वाढते. त्याच वेळी त्या क्षेत्रास प्रेमाचा फीड बॅक दिला जातो. यामुळे विचारांच्या प्रदूषणाचे परिणाम नाहीसे होण्यास साहाय्य मिळते.

**फळ बागांमध्ये नित्य नियमाने अग्निहोत्र आणि होम हवन करीत राहील्यास फळाचा आकार व आतील गर दुप्पट होऊ शकेल.** यासाठी सुरूवात करण्यास संत्रे हे असे फळ आहे की ज्यावर सुपरिणाम ताबडतोब दिसतील.

एखाद्यास होम हवनाचे प्रयोग करावयाचे असल्यास मोसंबी आणि संत्रे या दोन फळ झाडांवर ताबडतोब परिणाम दिसतील. होम हवनाचे वातावरणात पेअर वृक्षाच्या फळांची गोडी वाढलेली दिसेल.

## जमीन

अन्य कोणत्याही जमीनीपेक्षा होम हवन होत असलेल्या जमीनीत आर्द्रता जास्त काळ टिकून राहते. वातावरणावर होम हवनाचा फीडबॅक होण्याने आणि गाईच्या तुपामुळे असे घडून येते. जेंव्हा पोषण द्रव्ययुक्त वर्षा होते त्यावेळी ही पोषण द्रव्ये आणि आर्द्रता यांचे एक युनिट बनते व ते जमीनीत राहते. त्यामुळे भूमीतून निर्माण होणाऱ्या वनस्पती उत्पादनाची गुणवत्ता वाढते. हे आश्र्चर्यकारक वाटेल परंतू सत्य आहे.

होमा थेरपी व ऑरगॅनिक फार्मिंग मध्ये होम हवनाच्या प्रक्रियेचा परिणाम असा होतो की एका **'अपूर्व'** घटकाची जमीनीशी प्रतिक्रिया होऊन जमीनीत अगोदरच असलेली पोषण द्रव्ये अधिक गुणवान बनतात.

जमीनीत पोषण द्रव्यांची कमतरता असल्यास आरोग्यपूर्ण वनस्पती जीवनासाठी आवश्यक असणारी पोषण द्रव्ये होम हवन प्रक्रिये द्वारा प्राप्त होतात.

अग्निहोत्र वातावरणामुळे वनस्पतीची चयापचय क्रिया गतिमान होते. यात अग्निहोत्र प्रक्रियेत वापरलेले गाईचे तूप हा कॅटॅलिटिक (उत्प्रेरक) घटक आहे. अधिक सूक्ष्म स्तरावर विचार केल्यास अग्निहोत्राच्या अग्नित ज्वलन होत असलेले गाईचे तूप व अक्षता आणि उच्चारलेल्या मंत्रांच्या ध्वनि लहरींचा परिणाम या सर्वांचा एकत्रित परिणाम होऊन हे घडून येते. हा एकत्रित परिणाम सौर मंडला पर्यंत जाऊन तेथून परत येऊन जमीनीत प्रवेश करतो. मुळांनी शोषून घेतलेले पाणी आणि खनिज द्रव्य यांना चिकटून तो वनस्पतीत प्रवेश करते असेही म्हणता येईल. गाईचे तूप कॅटॅलिस्ट म्हणून कार्य करते. यामुळे वनस्पतीमध्ये एक रासायनिक प्रक्रिया

घडून येते. त्यामुळे एन्झाइम् आणि व्हिटॅमिन निर्मितीस मदत होते आणि चक्रगती प्रमाण (सायक्लिक रेट) वाढते. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास असे म्हणता येईल की **शेतामध्ये केवळ अग्निहोत्र केल्यामुळे वनस्पती परिपक्व होण्याचा वेग वाढतो आणि तिची रूची सुधारते.**

जमीनीत हवा खेळती ठेवणे हा शेतीचा एक महत्वाचा भाग आहे. मशागत करण्यापूर्वी जमीनीच्या पृष्ठभागावर अग्निहोत्र भस्म पसरविल्यास वनस्पतीचे पोषण आणि वनस्पती आनंदी होण्यास खूप मदत होते. वनस्पतीला आनंदी ठेवणे हे फार महत्वाचे आहे. कारण असे केल्याने वनस्पती आपल्याला प्रेमाचा फीडबॅक परिणाम देण्यास आरंभ करील.

आपण शेतामध्ये जेवढे प्रेम ओतू आणि जेवढे अग्निहोत्राच्या आधी वा नंतर होम हवन करू शकू तेवढे त्या क्षेत्रात जास्त प्रेमाची स्पंदने निर्माण होतील आणि लोक अधिक आनंदी राहतील आणि चव आणि रूची यात वाढ होईल.

जमीनीच्या पृष्ठभागावर अग्निहोत्र भस्म टाकल्यास जमीनीत असलेला नायट्रोजन आणि पोटॅशियम स्थिर होण्यास मदत होते.

जमीनीतील सूक्ष्म मूल द्रव्यात झपाट्याने बदल होत आहे. वनस्पतीचे वाढीसाठी आणि तिच्या परिपक्वतेसाठी ट्रेस एलिमेंट (सूक्ष्म मूल द्रव्ये) महत्वाची आहेत. होमा थेरेपी फार्मिंग (कृषी) हाच एकमेव उपाय आहे. होमा फार्मिंग केल्यामुळे निसर्गातील चक्र सुचारूरूपाने चालू राहते असे दिसून येईल.

वृक्षांची जमीनीवरील पकड़ निसटू लागली आहे. वृक्षांना आधार देण्याची जमीनीची क्षमता क्षीण होत आहे. झाडे उन्मळून पडत आहेत. होम हवनामुळे जमीन पोसली जाते. जमीनीतील पोषण द्रव्ये वाढतात.

होम हवनामुळे पर्यावरण क्षेत्रात लाभ होतो. उदाहरणार्थ **होम हवनामुळे गांढूळ जमीनीत अधिक ओलावा निर्माण करू शकतात**. होम हवनामुळे त्यांना आनंद मिळतो आणि त्यांचा हार्मोन्सचा स्त्राव वाढतो. त्यामुळे जमीनीला फायदा होतो. जमीनीवर वाढणाऱ्या वनस्पतीला फायदा होतो. गांढूळ हा प्राणी शेतीसाठी फार महत्वाचा आहे. होमाच्या वातावरणामुळे गांढुळाचे प्रजोत्पादन वृद्धिंगत होते. आणि त्यामुळे जमीनीची गुणवत्ता वाढते.

रासायनिक खतापासून शेतास मिळणारे तथाकथित फायदे कमी कमी होत जातील असे दिसून येईल. त्यांचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम दिसू लागल्याने त्यांचेवरील सरकारी निर्बंध कडक होत जातील. होमा ऑरगॅनिक फार्मिंग हा एकच उपाय आता उरला आहे.

## प्रजनन (रिप्रॉडक्शन)

**काही फळझाडाशेजारी अग्निहोत्र केल्यास त्यांचे प्रजनन चक्र गतीमान होते**. वनस्पतीची शक्ति जमीनीत असलेल्या पोषण द्रव्यावर तसेच वनस्पती भोवतालच्या वातावरणावर अवलंबून असते. आधुनिक शास्त्र वातावरणावर फारसा भर देत नाही. पण ऑक्सिजन रिसायक्लिंग सिस्टिम ध्यानात घेतली तर वातावरण हा अतिमहत्वाचा घटक आहे. होम हवनाने वातावरणातील पुष्टिकारकपणा वाढविला तर वनस्पतीला अधिकच आनंद होतो. बियांची उपजक्षमता वाढते. बिया उगवून येण्याची क्रिया कमी काळात होते. तसेच पराग पुष्परेणूंची गुणवत्ता वाढते. होम हवनामुळे वनस्पतीच्या प्रजनन चक्रावर सुपरिणाम होतो.

## पर्यावरणास साहाय्य

आता जीवनाच्या आधार तत्वांची पुर्नबांधणी पृथ्वीवर करणे आवश्यक आहे. जिवंत राहण्यासाठी होम हवनाची नितांत आवश्यकता आहे. याची प्रत्येकास जाणीव करून देणे अगत्याचे आहे. वातावरणातील पोषण द्रव्ये कमी होत आहेत. कसेही करून त्यांची भरपाई व्हावयास हवी. यासाठी होम हवन करणे हा उपाय आहे.

प्रदूषणाने नैसर्गिक घटकांमध्ये बदल होऊ लागतात परंतू ज्या ठिकाणी होम हवन केले जाते तेथे चुंबकीय सदृश आकर्षण करणारे क्षेत्र निर्माण झाल्याने जीवनाचे पोषण करणारे आवश्यक घटक पुनश्च पृथ्वीकडे आकर्षिले जातात. या घटकांचे स्थानांतरण होण्यासाठी एक वेगळाच मार्ग उपयोगात आणला जातो. असे आवश्यक घटक अन्य ग्रहांवरूनही येऊ लागतात.

अग्निहोत्र करताना उच्चारलेल्या ध्वनि लहरींचा अग्नीवर आघात होऊन त्यातून निर्माण होणाऱ्या विद्युत आणि ईथर यांचा झंझावाती प्रवाह सौर मंडलाकडे झेपावत जातो. हा झंझावाती प्रवाह जवळपासच्या क्षेत्रात पोषण द्रव्यांची प्रचंड उधळण करतो.

झाडांखाली जास्तीत जास्त लोकांनी अग्निहोत्र करणे आता फार जरूरीचे आहे. यामुळे वृक्षास अत्यानंद होतो आणि ते नाचू गाऊ लागतो. अग्निहोत्राकडे पक्षीही आकर्षित होतात. या होमामुळे पक्षांचे हिलींग होते.

होमा वृक्ष लवकरच सर्वत्र वाढतील. वृक्षाची ही एक नवीन जात असेल. आता होमाच्या प्रभावशाली वातावरणात असे वृक्ष वाढत आहेत.

निसर्गात प्रचंड खळबळ माजली आहे. फार मोठा विनाश येऊ घातला आहे. वातावरण पोषण द्रव्यांनी ओतःप्रोत भारून टाकावयास हवे. गाईचे तूप हे वाहक आहे. मंत्र ही शक्ती आहे. आता फार मोठ्या प्रमाणात होम हवन करणे जरूरीचे आहे.

पृथ्वीवरील मूल द्रव्ये प्रदूषणामुळे नष्ट होत आहेत. जीव सृष्टीला अत्यंत महत्वाच्या असणाऱ्या या बाबी होम केल्यानेच सुरक्षित राहतील.

## कीटक

संपूर्ण एकॉलॉजी सिस्टिममध्ये बदल होत आहे. वनस्पतीच्या प्रजनन चक्रात बदल होत आहे. यामुळे मधमाशा आणि त्यांचे परागीकरण करण्याचे कार्य यामध्ये अडथळा येत आहे. परिणामतः वनस्पतींची, विशेषतः काही प्रकारच्या भाजांच्या उत्पादन आणि पुर्ननिर्माण क्षमतेवर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

मधमाशीमध्ये उपजत असलेली विशिष्ट संप्रेरके (हार्मोन्स) होमा थेरेपीचे वातावरणातच कार्यरत होतात. शास्त्रज्ञांनी अद्याप हाताळला नाही असा हा अनोखा विषय आहे. ही संप्रेरके भाजीपाला आणि फळे यांमधील पोषकांची पातळी अधिक गतीने वाढवितात.

होमा थेरपी वातावरणाकडे मधमाशा आकर्षित होतात. याचे कारण अग्निहोत्र होमातील अग्निपासून त्यांना जी ऊर्जा प्राप्त होते त्यामुळे त्या आपले कार्य कुशलतेने करू लागतात. ही कुशलता पराग सिंचन क्रियेकरिता उपयोगात आणल्याने पीक उत्पादन वाढविण्यासाठी याची मदत होते. विशेषकरून मका, टोमॅटो, बेरी, अन्य फळे याबाबतीत हे प्रत्ययास येते.

होमा थेरपीचे होम शेतात केले गेल्यास केवळ तेवढयानेच कीटक नियंत्रणास परिणामकारक साहाय्य मिळू शकते. होमासाठी वापरलेल्या गाईच्या तुपाने वातावरण संपृक्त होते आणि श्वसना द्वारे शोषलेल्या या गाईच्या तुपाशी वनस्पती मधील रासायनिक घटकांचा एक विशेष रासायनिक संयोग होतो. या संयोगामुळे वनस्पतींमध्ये स्वतः भोवती एक संरक्षक आवरण निर्माण करण्याची क्षमता येते. होमा थेरेपी मध्ये मंत्रांचा उच्चार सतत होत राहील्याने वातावरणातील स्पंदनांच्या आशयावर आधारित होमाचे वातावरण एक विशेष **'अपूर्व'** निर्माण करते. त्यामुळे असे घडते.